जळगाव

बुधवार | १५ ऑक्टोबर २०२५ | वर्ष - २ | अंक - 259 | पृष्ठे - ४ | किंमत - २ रु. RNI : MAHMAR/2024/89643

दैनिक
# इनशॉट जळगाव

### न्यूज ब्रिफ

**दोन शाळकरी मुलांचा तलावात बुडून मृत्यू**

**टेंभुर्णी : वृत्तसंस्था**

जाफ्राबाद तालुक्यातील वाढोणा तांडा येथे दुर्दैवी घटना घडली असून, पोहण्यासाठी गेलेल्या दोन शाळकरी मुलांचा तलावात बुडून मृत्यू झाला आहे. मृत मुलांची नावे ओम गणेश आढे (वय ११) आणि कुणाल आढे (वय १३) अशी आहेत. दोघेही काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष गणेश आढे यांच्या भावाचे मुलगे असून, सध्या देऊळगाव राजा येथील शिवाजी हायस्कूलमध्ये शिक्षण घेत होते. ओम पाचवीत तर कुणाल सातवीत शिकत होता. शाळेच्या परीक्षा संपल्याने दोघे काही दिवसांसाठी वाढोणा तांड्यावर घरी आले होते.

## मतदान कुणाला जाते हेच कळत नाही

### उद्धव ठाकरेंचा निवडणूक आयोगाला सवाल

मुंबई : वृत्तसंस्था

आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतदार यादीतील गोंधळ, निवडणूक आयोगाचा कारभार आणि मतदार नोंदणी प्रक्रियेतील पारदर्शकतेच्या मुद्द्यांवरून विरोधकांनी निवडणूक आयोगाची भेट घेतली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, शिवसेना (उबाठा) नेते उद्धव ठाकरे, मनसेप्रमुख राज ठाकरे, जितेंद्र आव्हाड, बाळासाहेब थोरात, अनिल देसाई, अनिल परब, जयंत पाटील यांच्यासह विरोधी पक्षातील वरिष्ठ नेत्यांच्या शिष्टमंडळाने महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम



यांची भेट घेतली आहे.

या बैठकीत विविध नेत्यांनी निवडणूक प्रक्रियेतील त्रुटींबाबत थेट प्रश्न उपस्थित करत निवडणूक आयोगावर रोष व्यक्त केला आहे. यावेळी उद्धव ठाकरे यांनी विविध मुद्दे उपस्थित केले. उद्धव ठाकरेंनी मतदान कुणाला जाते हेच कळत नाही, असा सवाल उपस्थित केला आहे.

तसेच, उद्धव ठाकरे यांनी मतदार यादीतील गोंधळावर नाराजी व्यक्त केली आहे. देशात आता कुठेच निवडणुका नाहीत तर व्हीव्हीपॅट आणा, अशी मागणी देखील त्यांनी निवडणूक आयोगाकडे केली आहे. शिष्टमंडळाने दिलेल्या निवेदनात प्रमुख मुद्दे उपस्थित केले आहेत. निवडणूक आयोगाच्या कारभाराबद्दल सामान्यांच्या मनात खूपच शंका आहे.

खरंच निवडणूक आयोग हा स्वायत्त आहे याची शंका उत्पन्न होत आहे, लोकसभा, विधानसभेला किती मतदार वगळले त्याचा तपशील का मिळत नाही?, एखाद्या व्यक्तीचे नाव का काढले गेले ते त्याला का सांगितले जात नाही?, निवडणूक आयोगाने नावे, त्याचा पूर्ण तपशील संकेतस्थळावर उपलब्ध करावा, ३१ जानेवारीपर्यंत निवडणूक घेण्याचे आपल्याला आदेश आहेत, तुम्ही निवडणुकीसाठी सज्ज आहात का? ,असे विविध प्रश्नांबाबत शंका उपस्थित केली आहे.


### गोविंद पानसरे हत्या प्रकरण

## न्यायालयाकडून मुख्य आरोपींना जामीन मंजूर

कोल्हापूर : वृत्तसंस्था

मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर बेंचने मंगळवारी दिवंगत कम्युनिस्ट नेते गोविंद पानसरे हत्या प्रकरणातील तिन्ही मुख्य आरोपी – वीरेंद्र तावडे, शरद काळसकर आणि अमोल काळे यांना जामीन मंजूर केला आहे. एकल न्यायाधीश शिवकुमार डिगे यांनी तोंडी हा जामीन देण्याचा निर्णय दिला. या आदेशाची सविस्तर प्रत अद्याप उपलब्ध झालेली नाही. यासंबंधीचे वृत्त 'लाईव्ह लॉ'ने दिले आहे.

फिर्यादी पक्षाने मांडलेल्या प्रकरणानुसार, तावडे हा या प्रकरणातील मुख्य




सूत्रधारांपैकी एक आहे, ज्याने पानसरे यांच्या हत्येचा कट रचला होता. इतर दोन आरोपी शरद कळसकर आणि अमोल काळे यांच्यावरही तावडेबरोबर मिळून कट रचल्याचा आणि पानसरे व इतर विचारवंतांविरुद्ध तरुणांना भडकावल्याचा आरोप ठेवण्यात आला होता. पानसरे यांच्यावर १६ फेब्रुवारी २०१५ रोजी गोळ्या झाडण्यात आल्या.

## मुख्यमंत्र्यांचं शहर देशात अश्लील शेरेबाजीत पहिल्या क्रमांकावर !

नागपूर: वृत्तसंस्था

राज्याची उपराजधानी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे गृहनगर असलेले नागपूर शहर 'टायगर कॅपिटल' म्हणून देशभरात प्रसिद्ध आहे. मात्र, याच शहराने आता एका लाजिरवाण्या बाबतीत अव्वल स्थान पटकावले आहे. नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्युरो (एनसीआरबी) च्या ताज्या अहवालानुसार, सार्वजनिक ठिकाणी महिलांविरुद्ध अश्लील शेरेबाजी, शिवीगाळ



आणि अश्लील कृत्यांच्या गुन्ह्यांमध्ये नागपूर देशात पहिल्या क्रमांकावर आहे. ही बाब शहराच्या प्रतिमेला काळीमा फासणारी ठरली आहे.

एनसीआरबी अहवालातून उघड झाले वास्तव – एनसीआरबीच्या २०२३ च्या अहवालानुसार, नागपूर शहरात अश्लील कृत्ये, शेरेबाजी आणि द्विअर्थी गाणी यांसारख्या कृत्यांप्रकरणी भारतीय दंड संहितेच्या (आयपीसी) कलम २९४ आणि आता भारतीय न्याय संहितेच्या (बीएनएस) कलम २९६ अंतर्गत तब्बल ५५० हून अधिक गुन्हे नोंदवले गेले. यामुळे नागपूरने देशातील अन्य शहरांना मागे टाकत पहिला क्रमांक मिळवला आहे. दुसऱ्या क्रमांकावरील मध्य प्रदेशातील इंदूर शहरात यापेक्षा खूपच कमी गुन्हे नोंदले गेले.

## कुणबी प्रमाणपत्र वितरणाशिवाय नोकर भरती नको - जरांगे पाटील

धाराशिव : वृत्तसंस्था

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी शेतकऱ्यांसाठी आंदोलन उभारण्याची गरज व्यक्त केली आहे. तसेच, शेती नुकसानीच्या पंचनाम्यामुळे कुणबी प्रमाणपत्र वाटपासाठी सरकारला १५ दिवसांचा वेळ जरांगे पाटलांकडून देण्यात आला आहे. मात्र, कुणबी प्रमाणपत्र वितरीत झाल्याशिवाय कोणतीही नोकर भरती घेऊ नका, असेही जरांगे पाटील यांनी म्हटले आहे. कळंब तालुक्यातील डिकसळ येथे जरांगे पाटील यांनी माध्यमांशी संवाद साधत पुढील दिशा स्पष्ट केली आहे.

शेतकरी हा महत्वाचा घटक असून आम्ही शेतकऱ्यांची लेकरे आहोत. त्यामुळे, अतिवृष्टीने झालेल्या शेती नुकसानीचे पंचनामे करण्यासाठी सरकारला १५ दिवसांचा अवधी देण्यात येत आहे. कुणबी प्रमाणपत्र वितरीत झाल्याशिवाय कोणतीही नोकर भरती घेऊ नका.

## प्रवाशांनी भरलेली बस पेटली; लहान मुलं, महिलांसह १५ जणांचा मृत्यू

जैसलमेर : वृत्तसंस्था

राजस्थानच्या जैसलमेर जिल्ह्यात मंगळवारी दुपारी एका खासगी बसला लागलेल्या भीषण आगीने हाहाकार माजला. जैसलमेरहून जोधपूरकडे निघालेल्या या बसला थईयात गावाजवळ आग लागल्याची घटना घडली. या घटनेत ५७ प्रवाशांपैकी तीन लहान मुले आणि चार महिलांसह १५ जणांचा जळून मृत्यू झाला. आग इतक्या वेगाने पसरली की, काही मिनिटांतच संपूर्ण बस



ज्वाळांच्या भक्ष्यस्थानी गेली. स्थानिक ग्रामस्थ आणि लष्करी जवानांच्या तत्परतेमुळे अनेकांचे प्राण वाचले, परंतु ही दुर्घटना टाळता आली नाही.

ही दुर्घटना मंगळवारी दुपारी ३:३० वाजता, जैसलमेर-जोधपूर महामार्गावरील (NH 62) थईयात गावाजवळ घडली. दुपारी ३ वाजता जैसलमेर बसस्थानकातून ५७ प्रवाशांसह ही खासगी बस जोधपूरकडे रवाना झाली होती. बसच्या मागील भागातून अचानक धूर येऊ लागला आणि काही क्षणांतच आग भडकली.

## भूपतीसह ६० नक्षली करणार पोलिसांपुढे आत्मसमर्पण

गडचिरोली : वृत्तसंस्था

माओवादी कम्युनिस्ट पक्षाचा केंद्रीय समिती सदस्य तथा पॉलिट ब्युरो सदस्य मल्लोजुला वेणुगोपाल उर्फ भूपती उर्फ सोनू उर्फ अभय याच्यासह आणखी एक केंद्रीय समिती सदस्य, तसेच दंडकारण्य स्पेशल झोनल कमिटीच्या सदस्यांसह ६० नक्षलवादी गडचिरोली पोलिसांच्या ताब्यात असून, १५ ऑक्टोबरला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर आत्मसमर्पण करणार असल्याची विश्वसनीय माहिती आहे. देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी मार्च २०२६ पर्यंत छत्तीसगडमधील नक्षल्यांचा समूळ नायनाट करण्याचा चंग बांधला आहे.

## जिल्हा परिषद, पंचायत समितीत स्वीकृत सदस्य घेणार?

मुंबई : वृत्तसंस्था

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांतर्गत जिल्हा परिषदेत पाच आणि पंचायत समितीमध्ये दोन सदस्यांची स्वीकृत सदस्य म्हणून नेमणूक करण्यासाठी जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमात सुधारणा करण्यात यावी, अशी विनंती राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पत्राद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केली आहे.

मुख्यमंत्र्यांनी या विषयावर सकारात्मक प्रतिसाद देत ग्रामविकास विभागाला कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत. या सुधारणेनंतर ग्रामविकासात्मक प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी समाजाभिमुख कार्यकर्त्यांना



मिळेल असा विश्वास देखील बावनकुळे यांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, सरकारने हा निर्णय लागू केल्यास नगरपालिका, महापालिका यांप्रमाणे झेडपी आणि पंचायत समितीमध्येही स्वीकृत सदस्यांच्या नियुक्तीचा मार्ग मोकळा होणार आहे. ग्रामीण भागात सक्रिय काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना योग्य प्रतिनिधित्व आणि संधी मिळावी या दृष्टिकोनातून, विद्यमान महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियमामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे.

## "बिहारमध्ये महाआघाडीचे सरकार निश्चित"?

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

बिहारमधील महाआघाडीमधील जागावाटप लवकरच केले जाईल असे समाजवादी पक्षाचे आमदार रविदास मेहरोत्रा यांनी म्हटले आहे. इंडिया गटातील सर्व पक्षांमधील जागावाटप जवळजवळ पूर्ण झाले आहे.

लवकरच, एक-दोन दिवसांत, सर्व जागा अंतिम होतील. आघाडीमध्ये कोणत्याही प्रकारचे मतभेद नाहीत; जो उमेदवार जिंकण्याची शक्यता आहे त्याला तिकीट दिले जात आहे असे त्यांनी नमूद केले. बिहारमध्ये इंडिया आघाडीचे सरकार निश्चित आहे. बिहारमध्ये जोरदार लाट आहे. एनडीएच्या मित्रपक्षांमध्ये अनेक मतभेद आहेत.

### अवैध वाळू जीवावर: ट्रॅक्टरच्या चाकाखाली टाकण्याचा केला प्रयत्न

## वाळू माफियांचा हैदोस : तलाठ्यावर जीवघेणा हल्ला

जळगाव : वृत्तसंस्था

वाळू उपशावर कारवाई करण्यासाठी गेलेल्या तलाठ्यावर जीवघेणा हल्ला झाल्याची घटना घडली तसेच तलाठ्याला ट्रॅक्टरवरून खाली खेचत चाकाखाली टाकण्याचा प्रयत्न झाल्याने खळबळ उडाली आहे. जळगावच्या चोपडा तालुक्यातील बुधगाव येथे हा प्रकार घडला. दरम्यान, जळगाव जिल्ह्यात अवैध



वाळू मोठ्या प्रमाणावर तापली असून नूतन जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष घालावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

अवैध वाळू उपसा रोखण्यासाठी चोपडा तालुक्यातील बुधगाव येथील नदी पात्रात महसूल विभागाचे पथक गेले असता काही ट्रॅक्टर अवैध वाळू उपसा करीत होते व पथक आल्याचे कळताच इतर वाहने अंधाराचा फायदा घेत तिथून पसार झाले मात्र एक ट्रॅक्टर पथकाच्या हाती लागला. यावेळी तलाठी ट्रॅक्टरवर बसले मात्र चालक आणि मालकाने खाली खेचत चाकाखाली टाकण्याचा प्रयत्न केला. यात तलाठी गंभीर जखमी झाले. तलाठ्यावर रुग्णालयात उपचार सुरू असून चोपडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. चोपडा तहसीलदार भाऊसाहेब थोरात म्हणाले की, बुधगाव येथे मध्यरात्रीच्या सुमारास अवैध वाळू उपसा सुरू असल्याची गुप्त माहिती प्रशासनाला मिळाली. त्या माहितीच्या आधारे मंडल अधिकारी, तलाठी आणि इतर पाच कर्मचारी त्या ठिकाणी गेले. घटनास्थळी काही वाहने होती मात्र अंधाराचा फायदा घेऊन ती पसार झाली. मंडल अधिकारी आणि तलाठ्यांच्या हाती यावेळी एक ट्रॅक्टर लागला.

## ठाकरे बंधूंची दिवाळी होणार एकत्र !

मुंबई : वृत्तसंस्था

दिवाळीच्या निमित्ताने मुंबईतील शिवाजी पार्कवर ठाकरे बंधू एकत्र येत यावेळी दिवाळी धमाका पाहायला मिळणार आहे. मनसेच्यावतीने मुंबईतील शिवाजी पार्क मैदानावर दरवर्षी दीपोत्सव साजरा केला जातो. यावर्षीही दिवाळीच्या अगोदर दीपोत्सव सोहळा संपन्न होणार असून हा सोहळा खास असणार आहे. उद्धव ठाकरेंचे नाव मनसेच्या दीपोत्सव पत्रिकेत छापल्याने ठाकरे बंधू दिवाळीतच राजकीय धमाका करतात की काय याची



चर्चा होत आहे.

शिवाजी पार्कवरील यावर्षीच्या दीपोत्सव सोहळ्याचे उद्घाटन शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे करणार आहेत. आगामी महापालिका निवडणुकांच्या अनुषंगाने शिवसेना आणि मनसे एकत्र येणार असल्याचे आता जवळपास निश्चित मानले जात आहे. केवळ औपचारिक घोषणा आणि जागावाटप बाकी असल्याचा अंदाज राजकीय पदाधिकारी व्यक्त करत आहेत. शाळेतील तिसरी भाषा मराठा असावी, या मुद्द्यावरुन एकत्र येत ठाकरे बंधूंमधील दुरावा कमी झाला.

# अफगाणी मैत्री

एखाद्या देशाचा परराष्ट्रमंत्री भारत भेटीवर येतो, त्याप्रित्यर्थ भारताच्यावतीने त्याच्या देशाला आरोग्यविषयक सुविधांची मदत जाहीर केली जाते : वीस रुग्णवाहिका, पाच प्रसुतीगृह, एकतीस खाटांचं रुग्णालय, एक ट्रॉमा केअर सेंटर आणि कर्करोग निदान व उपचार केंद्र! सुविधांचं स्वरूप आणि संख्या, या दोन्ही गोष्टींवरून संबंधित देशाची आर्थिक स्थिती आणि आकार या दोन्ही बाबी स्पष्ट होतात. तरीही या गरीब, मागास, छोट्याशा देशाच्या परराष्ट्र मंत्र्यांच्या भारत दौऱ्याने भारतीय माध्यमांतून बरीच जागा व्यापली. या दौऱ्यानिमित्त बरीच उलटसुलट चर्चा झाली. कारण हा देश आशिया खंडाच्या हृदयस्थानी आहे. आशियात शांतता आणि स्थिरता हवी असेल, तर या देशाला सांभाळावं लागेल. बदलत्या आंतरराष्ट्रीय समीकरणात तर हा देश भारताच्या दृष्टीने खूपच महत्त्वाचा आहे.

म्हणूनच त्या देशाची सध्याची राजवट, तिथे झालेलं सत्तांतर, राज्यकर्त्यांची मागास विचारपद्धती या कशाचाही विचार न करता भारताने अफगाणिस्तानचे तालिबानी परराष्ट्रमंत्री अमिरखान मुत्तकी यांचं अगत्याने स्वागत केलं; भारत-अफगाणिस्तान मैत्रीच्या आणाभाकाही घेतल्या. भारत आणि अफगाणिस्तान हे खरे तर जुने मित्र. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यावेळीही अफगाणिस्तानने भारताच्या स्वातंत्र्यासाठी अनुकूल भूमिका घेतली होती. पण, विमान अपहरणाचं प्रकरण झालं, २०२१ मध्ये तालिबान्यांनी अफगाणिस्तानचा ताबा घेतला आणि भारताने या देशापासून चार हात लांब राहण्याचं धोरण घेतलं. पण, असं फार काळ करता येत नाही. आंतरराष्ट्रीय राजकारणात परिस्थितीनुसार भूमिका घ्याव्या लागतात; आपल्या मूळ भूमिकेत सुधारणा कराव्याच लागतात. पाकिस्तानच्या सीमेला लागून असलेल्या आणि तालिबानी राजवटीनंतरही पाकिस्तानशी हाडवैर असलेल्या अफगाणिस्तानला जोडून घेणं भारताच्या भूराजकीय रणनीतीच्या दृष्टीने आवश्यक होतं. तिथल्या तालिबानी सरकारची विचारसरणी, मूळ प्रवृत्तीकडे त्यासाठी काही काळ दुर्लक्ष करावं लागलं, तरी ते भारताच्या सुरक्षा आणि अन्य हितसंबंधांच्या दृष्टीने महत्त्वाचं होतं. भारत सरकारने नेमकं तेच केलं.

भारताची स्वतःची राजनैतिक भूमिका आहे. लोकशाही, प्रजासत्ताक, विकेंद्रित राजकीय व्यवस्थेला भारत नेहमीच पाठिंबा देत आला आहे. साम्राज्यवादी किंवा मूलतत्त्ववादी विचारांना, हिंसक-कालबाह्य दुराग्रहांना, स्त्रियांविषयी समानतेचा दृष्टिकोन न बाळगणाऱ्यांना भारत राष्ट्र म्हणून मित्र मानू शकत नाही; अशा सत्ताधाऱ्यांना मान्यताही देऊ शकत नाही. पण, मैत्रीच्या आपल्या निकषांवर, आपल्या मूल्यांवर श्रद्धा असलेले, समविचारी सत्ताधारी विविध देशांत येतीलच असं नाही. केवळ तेवढ्या मुद्द्यावर अडून आपण मैत्री गमावता गेलो, तर त्यातून आपल्या शत्रूंचंच फावेल. आपणच आपल्याला असं पेचात पकडून कसं चालेल? नेमका हाच विचार करून भारताने मुत्तकी यांचं अफगाणिस्तानचे परराष्ट्रमंत्री म्हणून आगतस्वागत केलं. त्यांच्याशी बोलणी केली. पण, तालिबानी राजवटीला अधिकृत मान्यता काही दिली नाही! तालिबानी राजवटीनेही भारताची अडचण लक्षात घेऊन मान्यतेचा आग्रह धरला नाही.

भारताबरोबर सहकार्याचा करार केला. या करारात संरक्षण, व्यापार आणि खनिज संपत्तीच्या उत्खननासह २०१६ मध्ये झालेल्या प्रत्यार्पण कराराचं पालन करण्याचंही ठरवण्यात आलं. रशिया वगळता अफगाणिस्तानातल्या तालिबानी राजवटीला अजून तरी अन्य कोणत्या देशाने अधिकृत मान्यता दिलेली नाही. पण, चीन त्या मार्गावर आहे. चीनपाठोपाठ पाकिस्ताननेही व्यूहरचना म्हणून या राजवटीला मान्यता दिली.

# ग्रंथालय शास्त्र

वाचन करणे हा सुखद आनंद देणारा क्षण असतो. जगातील अनेक महान व्यक्तिमत्त्वे वाचनाने घडल्याचे सांगतात. वाचन हा आत्मनुभूतीचा आनंद देणारा महत्त्वाचा घटक आहे. आज कितीही तंत्रज्ञानाचा शोध लागला तरी पुस्तकांचे महत्त्व कमी झालेले नाही. जगभरात अनेक दुर्मिळ ग्रंथालये आणि पुस्तके वाचकांच्या दिमतीला उभी आहेत. इंटरनेटच्या युगात पुस्तके संगणकावर आली तरी ग्रंथालयात जाऊन वाचणाऱ्यांची संख्या काही कमी नाही. अचूक संदर्भ शोधण्यासाठी ग्रंथालयाशिवाय पर्याय नसतो. कधी कधी आपल्याला आश्चर्य वाटते लाखो पुस्तकांच्या गराड्यातून ग्रंथपाल आपल्याला हवे ते पुस्तक अचूक कसं काय शोधून देतो? तर ही एक कला असते ग्रंथालय शास्त्राची अर्थात ते ही एक उत्तम व्यवस्थापन असते. यासाठी ग्रंथपालास त्याचे प्रशिक्षण घ्यावे लागते. एकंदरीत ग्रंथालय हा माहितीचा सर्वात मोठा स्रोत असून पुस्तकात रमणाऱ्यांसाठी हा करिअरचा उत्तम पर्याय होऊ शकतो. करिअरच्या दृष्टीने ग्रंथालय शास्त्र क्षेत्रात अनेक संधी आहेत.

## पात्रता


दहावी उत्तीर्ण झाल्यानंतर महाराष्ट्र शासनाचा ग्रंथालयशास्त्र प्रशिक्षणाचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम पूर्ण करता येतो. बारावी नंतर बी.एल.एस्सी. ही करता येतो. तसेच कोणत्याही पदवी नंतर बॅचलर डिग्री इन लायब्ररी सायन्स (बी. लिब.) कालावधी– एक वर्ष, हा पदवी अभ्यासक्रम पूर्ण करता येतो. त्यानंतर मास्टर्स डिग्री इन लायब्ररी सायन्स (एम.लिब.) हा एक वर्षाचा अभ्यासक्रम देखील उपलब्ध आहे. तसेच या विषयात एम.फिल. आणि पीएच.डी. करता येते. नेट, सेट या परीक्षा देखील देता येतात.

## आवश्यक गुण

यशस्वी ग्रंथपाल होण्यासाठी तुमच्याकडे उत्तम संवाद कौशल्य हवे. तसेच कालानुरूप अद्ययावत राहण्याची तयारी हवी. माहितीचा स्रोत म्हणून ग्रंथपालाकडे लोक पाहतात त्यानुसार या क्षेत्रातील नव्या बदलांची माहिती असावी तसेच संगणक हाताळणीचे ज्ञानही हवे.

# पर्सनल लोन घेताना

## इन्शुरन्स बंधनकारक आहे?



पर्सनल लोन घेताना अनेकदा बँक किंवा कर्ज देणारी संस्था आपल्याला इन्शुरन्स घेण्याचा सल्ला देते किंवा काही वेळा ते कर्जाच्या अटीत समाविष्ट केले जाते. त्यामुळे अनेकांच्या मनात प्रश्न निर्माण होतो की पर्सनल लोनसाठी इन्शुरन्स बंधनकारक आहे का आणि ते खरंच आवश्यक आहे का. या संदर्भात पर्सनल लोन इन्शुरन्स म्हणजे काय, ते आवश्यक आहे का, बँका किंवा एनबीएफसी ते का सुचवतात आणि त्याचे फायदे-तोटे काय आहेत, हे जाणून घेणे महत्त्वाचे ठरते.

पर्सनल लोन इन्शुरन्स, ज्याला लोन पेमेंट प्रोटेक्शन इन्शुरन्स असेही म्हटले जाते, हे मूलतः अशा परिस्थितीत उपयुक्त ठरते जेव्हा आपण आपले कर्ज परतफेड करू शकत नाही. नोकरी जाणे, गंभीर आजार, अपघात किंवा मृत्यू यांसारख्या प्रसंगी हे इन्शुरन्स कर्जाची संपूर्ण रक्कम किंवा काही भाग बँकेला आपल्याऐवजी परतफेड करते. त्यामुळे अशा वेळी आपल्या कुटुंबावर परतफेडीचा आर्थिक भार येत नाही आणि सुरक्षितता मिळते.

भारतात कायद्याने पर्सनल लोन इन्शुरन्स घेणे बंधनकारक नाही. कोणतीही व्यक्ती इन्शुरन्सशिवाय पर्सनल लोन घेऊ शकते. परंतु अनेक बँका किंवा एनबीएफसी ते ग्राहकांना घेण्याचा सल्ला देतात आणि काही वेळा स्पष्ट न सांगता कर्ज पॅकेजमध्ये सामावून घेतात. त्यामुळे कर्जाचे दस्तऐवज नीट वाचणे अत्यंत गरजेचे ठरते.

लोन इन्शुरन्स सुचवण्यामागे बँकांचा हेतू म्हणजे त्यांच्या पैशाचे संरक्षण करणे हा असतो. ग्राहकाला काही अडचण आली तर इन्शुरन्स कंपनी परतफेड करते, वसुलीची समस्या टळते आणि बँकेचे कर्ज सुरक्षित राहते. शिवाय काही बँकांना इन्शुरन्स विक्रीतून कमिशनही मिळते. मात्र इन्शुरन्स घेणे हा पूर्णपणे ग्राहकाचा निर्णय असतो, बंधनकारक नाही.

पर्सनल लोन इन्शुरन्सचे काही फायदे असे की नोकरी जाणे किंवा मृत्यू अशा दुर्दैवी प्रसंगी आपल्या कुटुंबावर परतफेडीची जबाबदारी येत नाही. यामुळे क्रेडिट स्कोअर सुरक्षित राहतो कारण ईएमआय थकित होण्याचा धोका टळतो. काही पॉलिसी हॉस्पिटल खर्च, अपघात किंवा आजारपण यांनाही कव्हर करतात. तसेच आवश्यक कागदपत्रे सादर केल्यास दावा प्रक्रिया साधी असते.

इन्शुरन्सचा खर्च कर्जाची रक्कम, मुदत, आपले वय–आरोग्य व कव्हरेज प्रकार यावर अवलंबून असतो. साधारणपणे एकदाच प्रीमियम भरावा लागतो आणि तो कर्जाच्या रकमेतीलच जोडला जातो. त्यामुळे ईएमआय किंचित वाढतो. अनेक बँक व इन्शुरन्स संकेतस्थळांवर कॅल्क्युलेटर उपलब्ध असतात ज्यातून नेमका खर्च समजू शकतो. म्हणून इन्शुरन्स घेण्याआधी वेगवेगळे पर्याय तुलना करणे योग्य ठरते.

तथापि काही प्रसंगी हे इन्शुरन्स घेणे फारसे फायदेशीर ठरत नाही. उदाहरणार्थ, आपल्याकडे आधीच लाईफ इन्शुरन्स किंवा हेल्थ इन्शुरन्स असल्यास वेगळे पॉलिसी घेण्याची गरज नसते. कर्जाची रक्कम कमी असेल किंवा कालावधी फारच लहान असेल तर हे इन्शुरन्स विशेष उपयोगी नाही. आर्थिकदृष्ट्या आपण सक्षम असाल आणि पुरेशा बचतीतून कर्ज फेडू शकत असाल तर अशा पॉलिसीवर पैसा खर्च करण्याचे औचित्य नाही. तसेच प्रीमियम खूप जास्त असेल तरही ते घेणे टाळावे.

एकूणात, भारतात पर्सनल लोन इन्शुरन्स घेणे बंधनकारक नसले तरी काही प्रसंगी ते उपयुक्त ठरते. त्यामुळे स्वतःच्या परिस्थितीचा विचार करूनच निर्णय घ्यावा. अटी–शर्ती नीट वाचूनच योग्य पर्याय निवडणे गरजेचे आहे.

₹



# शिक्षण व अध्यापनातील करिअर

**शिक्षण ही मानवाची मूलभूत गरज असून अध्यापन ही समाजाच्या घडणीची महत्त्वपूर्ण प्रक्रिया आहे. आजच्या काळात शिक्षण क्षेत्र हे केवळ नोकरीसाठी नव्हे तर समाजातील परिवर्तनासाठी, व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी आणि गुणवत्तापूर्ण मानव संसाधन तयार करण्यासाठी आवश्यक मानले जाते. अध्यापन व्यवसाय केवळ पुस्तक शिकविण्यापुरता मर्यादित नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वावर, विचारांवर आणि भविष्यातील वाटचालीवर सकारात्मक छाप टाकतो. म्हणूनच शिक्षण व अध्यापन हे करिअर पर्याय म्हणून निवडणे म्हणजे स्वतःच्या ज्ञानाचा समाजाच्या हितासाठी उपयोग करून घेणे होय.**

## बारावीनंतरचे शैक्षणिक मार्ग

बारावीनंतर शिक्षण व अध्यापन क्षेत्रात जाण्यासाठी अनेक पर्याय उपलब्ध आहेत. कला, वाणिज्य किंवा विज्ञान शाखेतून बारावीनंतर डी. एल.एड. तर पदवी घेतल्यानंतर बी.एड., एम.एड. अशा अभ्यासक्रमांद्वारे शिक्षक होण्याचा मार्ग खुला होतो. विज्ञान शाखेतील विद्यार्थी बी.एस्सी. नंतर बी.एड. करून माध्यमिक शाळेत विज्ञान शिक्षक होऊ शकतात, तर कला शाखेतील विद्यार्थी बी.ए. नंतर बी.एड. करून भाषा किंवा समाजशास्त्राचे अध्यापन करू शकतात. प्राथमिक स्तरावर शिक्षक होण्यासाठी डी.एल.एड. आवश्यक असते. उच्च शिक्षण संस्थांमध्ये प्राध्यापक होण्यासाठी पीएच.डी. करणे आवश्यक असते.

## कोणी निवडावे हे करिअर?

ज्यांना ज्ञानदानाची आवड आहे, ज्यांना विद्यार्थ्यांसोबत वेळ घालवून त्यांना मार्गदर्शन करणे आनंददायी वाटते, तसेच संयम, समजूतदारपणा आणि शिकवण्याची सर्जनशील पद्धत ज्यांच्याकडे आहे, अशांनी हा व्यवसाय निवडावा. मुलांशी संवाद साधण्याची आवड, अभ्यासक्रम सुलभ करून सांगण्याची क्षमता आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव असणाऱ्या व्यक्तींना हे करिअर सर्वाधिक शोभून दिसते.

## करिअर संधी

शिक्षण क्षेत्रात प्राथमिक शिक्षक, माध्यमिक शिक्षक, महाविद्यालयीन प्राध्यापक, शैक्षणिक संशोधक, समुपदेशक, शिक्षण धोरण निर्माता, अभ्यासक्रम डिझाइन करणारे तज्ज्ञ, शिक्षण प्रशासन अधिकारी अशा विविध पदांवर काम करण्याच्या संधी उपलब्ध आहेत. तसेच खासगी शिकवणी, ऑनलाइन शिक्षण प्लॅटफॉर्म, स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण संस्था यामध्येही मोठ्या प्रमाणावर रोजगार मिळू शकतो.

## प्रवेशासाठी आवश्यक अट

डी.एल.एड. साठी बारावी तर बी.एड.साठी पदवी किमान ठराविक टक्केवारीने उत्तीर्ण असणे आवश्यक असते. बी.एड. प्रवेशासाठी अनेक विद्यापीठे प्रवेश परीक्षा घेतात. बारावीनंतर चार वर्षांचा इंटिग्रेटेड बी.एड. कोर्स सुद्धा उपलब्ध आहे. शिक्षक पात्रता परीक्षाही (टीईटी, सीटीईटी) उत्तीर्ण करणे अनिवार्य असते.

## उपलब्ध अभ्यासक्रम

शिक्षण क्षेत्रात डी.एल.एड्., बी.एड्., एम.एड्., एम.फिल., पीएच.डी. हे प्रमुख अभ्यासक्रम आहेत. त्याशिवाय विशेष शिक्षण, बाल शिक्षण, शैक्षणिक तंत्रज्ञान, शालेय व्यवस्थापन, शैक्षणिक मानसशास्त्र अशा अनेक डिप्लोमा व प्रमाणपत्र अभ्यासक्रमांद्वारे तज्ज्ञता मिळवता येते.

## कौशल्य संच

एक चांगला शिक्षक होण्यासाठी संवादकौशल्य, संयम, शिस्त, व्यवस्थापन कौशल्य, तंत्रज्ञान वापरण्याची तयारी, अभ्यासक्रम सुलभ करून सांगण्याची पद्धत, विद्यार्थ्यांना प्रेरित करण्याची क्षमता, तसेच सतत शिकत राहण्याची वृत्ती आवश्यक आहे.

## प्रमुख संस्था व संघटना

भारतात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस, दिल्ली विद्यापीठ, बनारस हिंदू विद्यापीठ, टाटा ट्रस्ट, राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन परिषद, केंद्र व राज्य शिक्षक शिक्षण संस्था अशा अनेक ठिकाणी गुणवत्तापूर्ण शिक्षक प्रशिक्षण दिले जाते. सरकारी शाळा, खासगी शाळा, निवासी शाळा, आंतरराष्ट्रीय शाळा, महाविद्यालये व विद्यापीठे या क्षेत्रात नोकऱ्या उपलब्ध आहेत.

शिक्षण व अध्यापन हे समाजाच्या भविष्याशी निगडित सर्वात महत्त्वाचे क्षेत्र आहे. या क्षेत्रात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीवर पुढच्या पिढीला योग्य मूल्ये, ज्ञान व संस्कार देण्याची जबाबदारी असते. म्हणूनच हे करिअर निवडताना केवळ नोकरीचा विचार न करता सामाजिक कर्तव्याची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. योग्य कौशल्य, संयम व आवड असणाऱ्यांसाठी हे क्षेत्र केवळ स्थिर नोकरीच नव्हे तर समाज घडविण्याची संधीही प्रदान करते.

# डॉरमंट अकाऊंटच्या अंतरंगात...



आपण बराच काळ आपल्या बँक खात्यात कोणताही व्यवहार केला नाही तर ते खाते निष्क्रिय किंवा झोपलेल्या अवस्थेत गेलेले मानले जाते. साधारणतः आपण पैसे जमा केले नाहीत, पैसे काढले नाहीत, एटीएम वापरले नाही, नेटबँकिंग केले नाही किंवा बिलांचा भरणा केला नाही अशा स्थितीत खाते डॉरमंट बनते.

नियमांनुसार जर सलग २४ महिन्यांपर्यंत म्हणजेच दोन वर्षांपर्यंत खात्यात कोणताही व्यवहार झाला नाही तर ते खाते डॉरमंट घोषित केले जाते. येथे महत्त्वाचे म्हणजे शेवटचा व्यवहार खातेदाराने स्वतः केलेला असावा, बँकेने व्याज जमा केलेले किंवा शुल्क वजा केलेले व्यवहार ग्राह्य धरले जात नाहीत. उदाहरणार्थ, जर जानेवारी २०२३ मध्ये शेवटचा व्यवहार झाला आणि जानेवारी २०२५ पर्यंत काहीही हालचाल झाली नाही तर खाते डॉरमंट होईल.

खाते डॉरमंट होण्यामागे अनेक कारणे असू शकतात. काहीवेळा लोक नवीन खाते उघडतात आणि विसरतात, नोकरी बदलल्यामुळे जुन्या खात्यात पगार येणे थांबते, स्थलांतरामुळे जुने खाते वापरले जात नाही किंवा खातेदाराचा मृत्यू झाल्यानंतर कुटुंबाने ते खाते वापरले नाही तर ते निष्क्रिय राहते.

डॉरमंट खात्याचे धोकेही मोठे असतात. अशा खात्यावर व्याज मिळणे थांबते, बँक शुल्क आकारू शकते, एटीएम किंवा यूपीआय सेवा वापरता येत नाहीत आणि खातेदाराचा मृत्यू झाल्यास कुटुंबाला त्या खात्यातील पैसे मिळवणे अवघड ठरते. म्हणून जर खाते उपयोगाचे नसेल तर ते बंद करून टाकणे उत्तम.

अशा खात्याला पुन्हा सक्रिय करणे मात्र सोपे आहे. त्यासाठी संबंधित बँक शाखेत भेट द्यावी लागते. ओळखपत्र जसे की आधारकार्ड किंवा पॅनकार्ड सोबत न्यावे, बँकेने दिलेला री–ॲक्टिव्हेशन फॉर्म भरावा, आवश्यक असल्यास केवायसी कागदपत्रे द्यावी आणि एक छोटासा व्यवहार करावा. हे सर्व पूर्ण झाल्यानंतर खाते पुन्हा सक्रिय केले जाते.

खाते डॉरमंट होऊ नये यासाठी काही साधे उपाय करता येतात. जसे की खात्याचा वारंवार उपयोग करणे, अगदी छोट्या व्यवहारासाठीसुद्धा पैसे जमा किंवा काढणे, दर काही महिन्यांनी व्यवहार करण्याची आठवण ठेवणे, बँकेत नोंदवलेला मोबाईल क्रमांक अपडेट ठेवणे आणि जे खाते गरजेचे नाही ते बंद करणे.

एकूणच, डॉरमंट खात्याचा कालावधी २४ महिन्यांचा असतो हे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे. वेळोवेळी व्यवहार करून खाते सक्रिय ठेवले पाहिजे. मात्र जर खाते डॉरमंट झालेच तर योग्य कागदपत्रांसह बँकेत जाऊन ते सहजपणे पुन्हा सुरू करता येते.

₹

# कर्जासाठी रेपो लिंक्डचा पर्याय



**भारतीय रिझर्व्ह बँकेने यंदाच्या पतधोरण समितीच्या बैठकीत रेपो रेट ५.५ टक्क्यांवर कायम ठेवण्याचा निर्णय घेतला. ऑगस्ट महिन्यातही आरबीआयने दरात बदल केला नव्हता कारण महागाईत थोडी घट दिसून आली होती. चालू या वर्षाच्या सुरुवातीपासून आतापर्यंत रेपोदरात एकूण १०० बेसिस पॉइंटची कपात झाली असून त्याचा फायदा बँकांच्या लोन घेणाऱ्यांना आणि ठेवीदारांना दोघांनाही मिळाला आहे.तज्ज्ञांच्या मते जे लोक अजूनही एमसीएलआर किंवा बेस रेटवर लोन घेत आहेत, त्यांनी रेपो–लिंक्ड लोनमध्ये स्विच करण्याचा विचार करण्याची गरज आहे. ग्राहकांनी त्यांचे लोन रेपो–लिंक्ड आहे की नाही हे तपासले पाहिजे. तसेच विविध बँकांच्या दरांची तुलना करावी आणि जर व्याजदर जास्त असेल तर स्विच करण्याचा गंभीरपणे विचार करावा. यानिमित्ताने एमसीएलआर आणि आरएलएलआर म्हणजे काय हे जाणून घेणे औचित्याचे ठरते.**

स्वतःचे घर घेण्याचे स्वप्न प्रत्येकाच्याच मनात असते आणि हे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी सर्वांत सोपी आणि सोयीची पद्धत म्हणजे गृहकर्ज घेणे. गृहकर्ज देणाऱ्या बँका किंवा वित्तसंस्था कर्जाच्या व्याजदरासाठी दोन प्रमुख प्रकार वापरतात. पहिला म्हणजे रेपो लिंक्ड लेंडिंग रेट (आरएलएलआर) आणि दुसरा मार्जिनल कॉस्ट ऑफ फंड बेस्ड लेंडिंग रेट (एमसीएलआर) या दोन्ही संकल्पना नीट समजून घेणे आवश्यक आहे, जेणेकरून कर्जदारांना आपला होम लोन अधिक स्पष्टपणे समजेल.

**आरएलएलआर म्हणजे काय?**

रेपो लिंक्ड लेंडिंग रेट हे नावाप्रमाणेच रिझर्व्ह बँकेच्या रेपो रेटशी थेट जोडलेले असते. प्रत्येक बँकेचा आरएलएलआर वेगळा असतो. कर्जाची रक्कम किती आहे, कर्जदार कोणत्या जोखीम गटात येतो, लोन–टू–वॅल्यू प्रमाण किती आहे यांसारख्या विविध बाबींवर हा दर अवलंबून असतो. जर कर्ज रेपो लिंक्ड दरावर दिले गेले असेल, तर रेपो रेट कमी–जास्त झाल्यावर गृहकर्जाचा व्याजदरही थेट कमी–जास्त होतो.

आरएलएलआर मोजण्याची पद्धत सोपी आहे. आरएलएलआर = रेपो रेट + स्प्रेड. रेपो रेट म्हणजे बँका रिझर्व्ह बँकेकडून ज्या दराने कर्ज घेतात तो दर. स्प्रेड म्हणजे बँका आपला संचालन खर्च आणि नफा लक्षात घेऊन लावलेली अतिरिक्त टक्केवारी. त्यामुळे रेपो रेट बदलल्यास कर्जदाराचा व्याजदर लगेच बदलतो. यामुळे आरएलएलआर पारदर्शक आणि जलदगतीने बदलणारा दर मानला जातो. एमसीएलआरच्या तुलनेत तो अधिक गतिमान आहे.

**एमसीएलआर म्हणजे काय?**

एमसीएलआर म्हणजे मार्जिनल कॉस्ट ऑफ फंड बेस्ड लेंडिंग रेट. हा तो किमान दर आहे ज्याखाली बँक आपल्या ग्राहकांना कर्ज देऊ शकत नाही. हा दर बँक स्वतःच्या निधीच्या खर्चावर आधारित ठरवते, मात्र त्यासाठी रिझर्व्ह बँकेच्या नियमांचे पालन करावे लागते. या दरावर साधारणपणे एक मर्यादित वाढ म्हणजे स्प्रेड जोडला जातो आणि त्यानंतरच कर्जदाराचा प्रत्यक्ष व्याजदर ठरतो. त्यामुळे कर्जदाराचा क्रेडिट स्कोअर, बँकेचा धोका आदी बाबींवर व्याजदर थोडा वरखाली होतो. एमसीएलआर दर महिन्याला किंवा तिमाहीला बदलू शकतो. त्यामुळे कर्जाचा हप्ता काही काळ स्थिर राहतो आणि नंतर बदलतो. जर एमसीएलआर खाली आला तर व्याजदर आणि ईएमआय कमी होतात, पण दर वाढल्यास कर्जदारावर हप्त्याचा भार वाढतो.

आरएलएलआर आणि एमसीएलआर यामध्ये काही महत्त्वाचे फरक आहेत. आरएलएलआर हा बाह्य बेंचमार्क म्हणजेच थेट रेपो रेटशी जोडलेला असल्याने रेपो रेटमधील बदल लगेचच कर्जदाराला जाणवतो. यामध्ये दर तीन महिन्यांनी पुनर्नियोजन केले जाते. एमसीएलआर मात्र बँकेच्या अंतर्गत खर्चावर ठरतो आणि त्याचा पुनर्नियोजन कालावधी साधारणतः सहा महिने किंवा एक वर्ष असतो. रेपो रेटमधील कपात आरएलएलआर मधून लवकर पोहोचते, तर एमसीएलआरमध्ये ती हळूहळू पोहोचते.

गृहकर्ज घेताना अनेकांना प्रश्न पडतो की कोणता दर फायदेशीर आहे. जर आपल्याला जास्त पारदर्शकता हवी असेल आणि रेपो रेट कमी होण्याची शक्यता वाटत असेल, तर आरएलएलआर निवडणे योग्य ठरते. कारण रेपो रेट कमी झाल्यावर त्याचा त्वरित फायदा कर्जदाराला मिळतो आणि हप्ते कमी होतात. पण रेपो रेट वाढल्यास त्याच वेगाने हप्त्यांवर भार वाढतो. दुसरीकडे, एमसीएलआर हा तुलनेने स्थिर पर्याय आहे. जर रेपो रेट वाढण्याची शक्यता जास्त वाटत असेल, तर एमसीएलआरमुळे थोडा वेळ मिळतो आणि हप्त्यांवरील वाढ तत्काळ होत नाही.

एमसीएलआर अद्याप अनेक कर्जांमध्ये वापरला जातो. सध्या एमसीएलआर दर साधारणतः ६.८० टक्क्यांपासून ७.६५ टक्क्यांपर्यंत आहे, तर आरएलएलआर दर ८.४० टक्क्यांवर आहे.

गृहकर्ज घेणाऱ्यांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की कोणता दर आपल्या सोयीचा आहे. ते आपला क्रेडिट स्कोअर, उत्पन्नाची स्थिरता आणि भावी व्याजदरातील चढउतार यांचा विचार करून ठरवावे. रेपो लिंक्ड गृहकर्जे अधिक पारदर्शक असतात आणि कपातीचा फायदा पटकन देतात. तर एमसीएलआर थोडी स्थिरता प्रदान करते. योग्य पर्यायाची निवड केल्यास कर्जदाराला दीर्घकालीन मोठा फायदा होऊ शकतो.

₹

दैनिक इनशॉट जळगाव हे वृत्तपत्र, मुद्रक, प्रकाशक व मालक संदिप प्रकाश महाले यांनी परेश प्रिंटर्स, डी.८७, गोपाल दाल मिल, एमआयडीसी, जळगाव ४२५००२ येथून प्रसिध्द केले. संपादक - संदीप प्रकाश महाले RNI: MAHMAR/2024/89643

Daily Inshot Jalgaon Printed, published and Owned by sandeep prakash mahale, and printed at Paresh printed at D-87 gopal dal mill, Midc Jalgaon-425002.Editor - sandeep prakash mahale - RNI: MAHMAR/2024/89643

# युवारंग महोत्सवात मू.जे.महाविद्यालयाला सर्वसाधारण विजेतेपद

## सर्वसाधारण विजेतेपद प्राप्त केल्याचा साजरा केला जल्लोष

जळगाव : प्रतिनिधी

कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाने दि. ०८ ऑक्टोबर ते १२ ऑक्टोबर या कालावधीत रायसोनी अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन कॉलेजमध्ये आयोजित केलेल्या युवारंग -२०२५ या रौप्य महोत्सवी युवक महोत्सवात जळगावच्या मूळजी जेठा महाविद्यालयाने दिमाखात सर्व साधारण विजेते पद प्राप्त केले आहे. त्यानिमित्ताने महाविद्यालयात सर्व विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी जल्लोष साजरा करत आंनद प्रकट केला. यावेळी सर्व पारितोषिक, स्मृती चिह्ने आणि प्रमाणपत्र यांची आरास रचण्यात आली.






विविध बक्षिसांचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी केसीईं सोसायटीचे शैक्षणिक संचालक डॉ. मृणालिनी फडणवीस,प्रशासकीय अधिकारी शशिकांत वडोदकर, चारुदत्त गोखले, मानव्य शाखेचे उपप्राचार्य प्रा. देवेंद्र इंगळे, विज्ञान शाखेचे उपप्राचार्य डॉ. मनोज चोपडा, अधिष्ठाता डॉ. भूपेंद्र केसूर, अधिष्ठाता डॉ. देवानंद सोनार, डॉ. मनोज महाजन, डॉ. विजय लोहार, डॉ. योगेश महाले, डॉ. गायत्री खडके, ओजस्विनी कला विभागाचे प्रा. मिलन भामरे, प्रा. हेमंत पाटील, प्रा. गोपीचंद धनगर, प्रा. वर्षा उपाध्ये, प्रा. अजय शिंदे, प्रा. देवेंद्र गुरव, प्रा. वैभव मावळे, प्रा. मंगेश वाघ, सुभाष तळेले, दत्तात्रय कापुरे, युवराज चौधरी, कुलदीप भालेराव आणि स्पर्धक कलावंत विद्यार्थी उपस्थित होते.

या महोत्सवात संगीत कला, नृत्य कला, साहित्य कला, नाट्य कला आणि ललित कला अशा एकूण पाच कलाप्रकारातील एकूण सर्व २६ कला प्रकारांमध्ये मू. जे. महाविद्यायाचे एकूण ४२ स्पर्धक विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यांच्यासोबत पुरुष संघ व्यवस्थापक म्हणून डॉ. विजय लोहार, महिला संघ व्यवस्थापक म्हणून डॉ. गायत्री खडके आणि सांस्कृतिक समन्वयक म्हणून डॉ. मनोज महाजन आणि सोबत सहकार्यासाठी दत्तात्रय कापुरे आणि युवराज चौधरी यांचा सहभाग होता. तसेच कला प्रकारांमधील विविध स्पर्धांच्या तयारीसाठी प्रा. अजय शिंदे, प्रा. देवेंद्र गुरव, प्रा. वैभव मावळे, प्रा. पियुष बडगुजर, प्रा. मंगेश वाघ, प्रा. मयुरी हरीमकर, प्रा. वर्षा उपाध्ये यांचे मोलाचे सहकार्य लाभले. केसीईं सोसायटीचे अध्यक्ष प्रज्ञावंत नंदकुमार बेंडाळे यांच्या मार्गदर्शनात, सांस्कृतिक समन्वयक प्रशासकीय अधिकारी शशिकांत वढोदकर, मू. जे. महाविद्यालायचे प्राचार्य डॉ. सं. ना. भारंबे, महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. योगेश महाले, डॉ. नयना पाटील, डॉ. सोनाली शर्मा, डॉ. अनिल क्षीरसागर, प्रा. प्रसाद देसाई, प्रा. हेमंत पाटील, डॉ. विवेक यावलकर, डॉ. विशाल देशमुख, डॉ. एल. पी. वाघ, डॉ. वाय. एस. बोरसे, प्रा. कमलाकर रूगे आणि अन्य प्राध्यापक वेळोवेळी उपस्थित राहिलेत.

## लाच प्रकरण : तलाठ्यासह कोतवालाची पोलिस कोठडीत रवानगी

जळगाव : प्रतिनिधी

वाळू वाहतुकीचे वाहन चालू देण्यासह कारवाई न करण्याच्या मोबदल्यात 73 हजारांची लाच मागून ती स्वीकारताना भुसावळ तहसील कार्यालयासमोर वराडसीम तलाठी नितीन पंडितराव केले (46), कठोरा कोतवाल जयराज रघुनाथ भालेराव (49), तिघ्रे, ता.भुसावळ येथील खाजगी पंटर शिवदास लटकन कोळी (59) यांना जळगाव एसीबीने सोमवारी दुपारी अटक केली होती. दरम्यान, अटकेतील लाचखोरांना मंगळवारी भुसावळ अतिरिक्त सत्र न्यायालयात हजर केले असता दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली.

दरम्यान, कारवाईप्रसंगी तलाठी केले यांच्या बॅगेत तब्बल एक लाख 65 हजारांची रोकड तर खाजगी पंटर कोळी याच्याकडे लाचेच्या 73 हजारांव्यतिरिक्त 86 हजारांची रोकड आढळली होती. एसीबीने न्यायालयात युक्तीवाद करताना सांगितले की, खाजगी पंटर शिवदास कोळी याने ही 86 हजारांची रक्कम जळगावातील वाळू वाहतूकदाराकडून वसुल केल्याची कबुली दिली आहे तर केले मात्र सोबत असलेल्या रकमेबाबत काही एक बोलत नसल्याने चौकशी करणे गरजेचे आहे. अटकेतील तीन आरोपींचे एकमेकांशी झालेले संभाषण तसेच त्यांच्या प्रॉपर्टीची माहिती, बँक खात्यांचे व्यवहार तपासायचे आहेत तसेच त्यांनी हप्ते कुणाच्या सांगण्यावरून कुणासाठी वसुल केले आहेत ? यासाठी पोलिस कोठडी हवी असल्याचे तपासाधिकारी स्मिता नवघरे व सरकारी वकील मोहन देशपांडे यांनी न्यायालयात सांगितले.

## शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी

जळगाव : प्रतिनिधी

प्रेम नगर येथील बी. यू. एन. रायसोनी इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये विद्यार्थ्यांचा केवळ स्पर्धा परीक्षा व शैक्षणिक प्रगतीकडेच भर दिला जात नाही, तर त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी क्रीडा क्षेत्रालाही तितकेच महत्त्व दिले जाते. शाळेमध्ये विद्यार्थ्यांना विविध खेळांमध्ये सहभागी होण्यासाठी सतत प्रोत्साहन दिले जाते. खो-खो, कबड्डी, बुद्धिबळ, फुटबॉल आदी खेळांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवला. मनपा पातळीवर झालेल्या स्पर्धांमध्ये काही विद्यार्थ्यांनी उत्तम प्राविण्य मिळवत शाळेचे नाव उज्ज्वल केले.



त्यांच्या या उत्कृष्ट कामगिरीचा गौरव करण्यासाठी शाळेमध्ये शाळेचे अध्यक्ष श्री शिरीष रायसोनी व उपाध्यक्ष श्री उमेद रायसोनी यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र व प्रमाणपत्र वितरण सोहळा आयोजित करण्यात आला. या प्रसंगी विजेत्या विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला आणि त्यांना पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

शाळेच्या प्राचार्य श्री. मनोज शिरोळे यांनी सांगितले की, "विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास म्हणजे केवळ अभ्यास नव्हे, तर क्रीडा, संस्कार आणि स्पर्धात्मक दृष्टिकोन यांचा संगम होय."

## मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांचा गौरव

जळगाव : प्रतिनिधी

जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातील १३ आरोग्य सहाय्यक, एलएचव्ही व एनएम कर्मचाऱ्यांना आरोग्य विस्तार अधिकारी या पदावर पदोन्नती मिळाली असून, तसेच ७२ आरोग्य कर्मचाऱ्यांना सेवार्थ प्रणालीमध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे व प्रयत्नांमुळे मागील पाच महिन्यांपासून रखडलेला या कर्मचाऱ्यांचा पगारही मार्गी लागला आहे.



या उल्लेखनीय निर्णयाबद्दल महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाचे जिल्हाध्यक्ष संजय ठाकूर, महाराष्ट्र राज्य बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी संघटना (नोंदणी क्रमांक 1173/04) चे जिल्हा कार्याध्यक्ष सुनील शिंदे, जिल्हा सरचिटणीस भालचंद्र पवार तसेच श्रामदार तडवी, आरोग्य निरीक्षक यांनी कर्मचारी संघटनेतर्फे मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांची कार्यालयात भेट घेऊन वह्या भेट देऊन सत्कार केला.

या प्रसंगी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या संवेदनशील नेतृत्वामुळे आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांच्या अनेक प्रलंबित प्रश्नांची सोडवणूक झाली असून, कर्मचाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे."

## वॉचमनने महिलेच्या हातावर चाकूने वार

जळगाव : प्रतिनिधी


शहरातील मोहाडी रोडवरील बालाजी हाईट्स येथे वॉचमन कडून रहिवाशी महिलेवर चाकूने वार करून हाताला दुखापत केल्याची धक्कादायक घटना सोमवारी १३ ऑक्टोबर रोजी दुपारी १ वाजता समोर आली आहे. याबाबत दुपारी ४ वाजता एमआयडीसी पोलीस ठाण्यात वॉचमनवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मिळालेली माहिती अशी की, जळगाव शहरातील मोहाडी रोडवरील बालाजी हाईट्स या अपार्टमेंटमध्ये आरोही इंद्रकुमार ललवाणी वय ३८ या महिला आपल्या पतीसह वास्तव्याला आहेत. या अपार्टमेंटमध्ये गोकुळ हंसराज राठोड रा. सांगवी ता. चाळीसगाव हा वॉचमन म्हणून काम पाहतो. दरम्यान सोमवारी १३ ऑक्टोबर रोजी दुपारी १ वाजेच्या सुमारास वॉचमन गोकुळ राठोड हा महिलेच्या घरी आला आणि पाणी पाहिजे असे सांगितले. नंतर दिवाळी करण्यासाठी पैसे व वस्तूची मागणी करून लागला. दरम्यान माझे पती घरी नसल्याचे महिलेने सांगितल्यानंतर त्याने किचनमध्ये जावून चाकून हातात घेवून महिलेच्या हातावर वार करून गंभीर दुखापत केली. हा प्रकार घडल्यानंतर गोकुळ हा पसार झाला. याप्रकरणी महिलेने एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

## पथदिव्यांच्या अंधारात मनसेचे, “मोबाईल लाईट आंदोलन”

जळगाव : प्रतिनिधी

मोहाडी परिसरातील नव्याने उभारण्यात आलेल्या शासकीय रुग्णालयाकडे जाणाऱ्या रस्त्यावर पथदिव्यांचा पूर्ण अंधार असल्यामुळे रुग्ण, विशेषतः गर्भवती माता आणि त्यांच्या नातेवाईकांना दररोज जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागतो. या गंभीर दुर्लक्षा विरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे अनोखे आंदोलन करण्यात आले.



मनसेच्या कार्यकर्त्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनी रात्रीच्या वेळी मोबाईलचा लाईट प्रज्वलित करून पथसंचलन केले व शासनाच्या निष्क्रियतेचा जाहीर निषेध नोंदवला. पथदिवे नसल्यानं रुग्णालयाच्या रस्त्यावर जीव मुठीत घेऊन चालावे लागते, हे शासनाच्या विकासाच्या घोषणांना काळा फटका आहे,” असा रोष कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

कोट्यवधी रुपयांचा खर्च करून उभारण्यात आलेले हे शासकीय रुग्णालय १०० खाटांचे असून प्रसूती विभागही येथे कार्यरत आहे. मात्र, इतक्या महत्त्वाच्या आरोग्य केंद्राकडे जाणाऱ्या रस्त्यावर एकही पथदिवा कार्यरत नसल्यामुळे रात्रीच्या वेळेस रुग्ण व नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.

रुग्णालयाच्या रस्त्यावर दिव्यांचा अभाव हा प्रशासनाच्या निष्क्रियतेचा आणि नियोजन शून्यतेचा स्पष्ट दाखला असल्याचे मनसे पदाधिकाऱ्यांनी सांगितले. याबाबत रुग्णालय प्रशासनाने तातडीने उपाययोजना करावी, अन्यथा मनसेकडून पुढील उग्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला. “अंधारात प्रकाश दाखवणारे हे आंदोलन जनतेच्या डोळ्यांतील सत्य उजेडात आणणारे ठरले,” अशा शब्दांत नागरिकांनी मनसेच्या या उपक्रमाचे कौतुक केले. मोहाडी रस्त्यावरील शासकीय रुग्णालय रस्त्यावर तातडीने पथदिवे बसवावेत. अन्यथा मनसेकडून अधिक तीव्र आंदोलन छेडले जाईल.

या अनोख्या आंदोलनात मनसेचे जिल्हाध्यक्ष ॲड जमील देशपांडे महानगर अध्यक्ष किरण तळेले, उपमहानगर अध्यक्ष श्रीकृष्ण मेंगडे,ललित शर्मा,राजेंद्र निकम,प्रकाश जोशी,चेतन पवार, शेतकरी सेनचे अविनाश पाटील, राहुल चव्हाण, दीपक राठोड,ॲड सागर शिंपी,हर्षल वाणी, ऐश्वर्य श्रीरामे,विकास पाथरे, महिला सेनेच्या अनिता कापुरे,लक्ष्मी भील व पदाधिकारी आणि अनेक कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## न्यूज ब्रिफ

### कुटुंबाला लाकडी दांडक्याने मारहाण

जळगाव : प्रतिनिधी

तालुक्यातील कानळदा गावात एका कुटुंबाला शिवीगाळ करून लाकडी दांडक्याने बेदम मारहाण करून दुखापत केल्याची घटना रविवारी १२ ऑक्टोबर रोजी रात्री ९ वाजता घडली आहे. याबाबत जळगाव तालुका पोलीस ठाण्यात चार जणांविरोधात सोमवारी १३ ऑक्टोबर रोजी पहाटे ५ वाजता गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, जळगाव तालुक्याती कानळदा गावात सुनिता रूपजा सोळंखे वय ३५ या महिला आपल्या परिवारासह वास्तव्याला आहे. मुलांवरून झालेल्या वादातून सुनिता सोळंखे यांच्या संपुर्ण कुटुंबाला गावात राहणारे दिलीप बारेला, सुनिल बारेला, अनिल बारेला आणि सयाबाई बारेला सर्व राहणार कानळदा ता. जळगाव या चौघांनी शिवीगाळ करत लाकडी दांडक्याने बेदम मारहाण करून गंभीर दुखापत केली. याप्रकरणी महिलेने जळगाव तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार जळगाव तालुका पोलीस ठाण्यात मारहाण करणाऱ्या चौघांविरोधात सोमवारी १३ ऑक्टेबर रोजी पहाटे ५ वाजता गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोहेकॉ कैलास इंगळे हे करीत आहे.

### कुजलेला मृतदेह आढळल्याने खळबळ

अमळनेर : प्रतिनिधी

येथील धार रस्त्यावर झाडाला लटकलेल्या अवस्थेत एक इसमाचे कुजलेले प्रेत आढळून आल्याचा प्रकार सोमवारी १३ ऑक्टोबर रोजी दुपारी ४ वाजता समोर आले आहे. याबाबत अमळनेर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून मयताची ओळख पटविण्याचे आवाहन पोलीसांनी केले आहे. अमळनेर शहरातील चिन्मय हॉटेलच्या पुढे माजी नगरसेवक नरेंद्र चौधरी यांच्या शेताजवळ झाडाला गळफास घेवून लटकलेला अनोळखी ३२ वर्षीय व्यक्तीचा कुजलेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आल्याची घटना सोमवारी १३ ऑक्टोबर रोजी दुपारी ४ वाजता समोर आली. घटनेचे वृत्त पोलिसांना कळताच विभागीय पोलीस अधिकारी विनायक कोते , पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम त्यांचे सहकारी तसेच फॉरेन्सिक पथकाने भेट दिली. दरम्यान मयताचा मृतदेह मिळून आल्याने रात्री उशिरापर्यंत पंचनामा सुरू होता. याबाबत अमळनेर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून मयताची ओळख पटवावी असे आवाहन अमळनेर पोलीसांनी केले आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम हे करीत आहे.

दैनिक इनशॉट जळगाव
बुधवार दि.१५ ऑक्टोबर २०२५

# जळगाव मिरर



## न्यूज ब्रिफ

### तरुणाला जबर मारहाण

**जळगाव : प्रतिनिधी**

शहरातील हरीविठ्ठल नगर परिसरामध्ये काहीही कारण नसताना एका तरुणाला त्याचा रस्ता अडवून लाथाबुक्क्यांनी मारहाण करत खिशातून ब्लेडने छातीवर व पाठीवर वार करून जखमी केल्याची घटना सोमवार १३ नोव्हेंबर रोजी सकाळी ९.३० वाजता घडली आहे. या संदर्भात दुपारी ३ वाजता रामानंदनगर पोलीस ठाण्यात एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी की, संदीप पप्पू पाटील वय-२४ रा. हरीविठ्ठल नगर जळगाव हा तरुण आपल्या कुटुंबीय सहवास्तव्याला आहे. दरम्यान सोमवारी १३ ऑक्टोबर रोजी सकाळी ९.३० वाजता परिसरात राहणारा भज्या कोळी रा. हरीविठ्ठल नगर याने काहीही कारण नसताना संदीप पाटील यांच्या पाठीवर व पोटावर धारदार ब्लेडने वार करून त्याला गंभीर दुखापत केली.

## देहदान केलेल्या व्यक्तींच्या कुटूंबातील सदस्यांप्रती कृतज्ञता

# ज्ञानदानाच्या कार्याला देहदानाची मौलिक जोड - डॉ.उल्हास पाटील

**जळगाव : प्रतिनिधी**



देहदान करणारे व्यक्ती आणि त्यांचे कुटूंब हे समाजाचे खरे दूत आहेत. भावी डॉक्टर घडविण्यात देहदानाची भूमिका अत्यंत मोलाची आहे. ज्ञानदानाच्या या कार्याला देहदानाची ही मौलिक जोड असल्याचे प्रतिपादन गोदावरी फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. उल्हास पाटील यांनी व्यक्त केले. दरम्यान यावेळी देहदान करणार्या व्यक्तींच्या कुटूंबाप्रती डॉ. उल्हास पाटील वैद्यकीयातर्फे कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयाच्या अॅनाटॉमी विभागातर्फे जागतिक शरीररचना शास्त्र दिनानिमीत्त देहदान करणार्या व्यक्तींच्या कुटूंबातील सदस्यांच्या सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर वैद्यकीय महाविद्यालयाचे अधीष्ठाता डॉ. प्रशांत सोळंके, डीएम कार्डीओलॉजीस्ट डॉ. वैभव पाटील, रजीस्ट्रार प्रमोद भिरूड, होमीओपॅथी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राकेश मिश्रा, फिजीओथेरेपी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयवंत नागुलकर, आयुर्वेद महाविद्यालयाचे डॉ. उमाकांत चौधरी, रूग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रेमचंद पंडीत, सीईओ डॉ. विजय बाविस्कर, अॅनाटॉमी विभागाच्या प्रमुख डॉ. शुभांगी वाघ हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरूवातीला मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन आणि स्व. गोदावरी आजी यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. माजी खा. डॉ. उल्हास पाटील पुढे म्हणाले की, जन्म आणि मृत्यू हे अंतीम सत्य आहे. देहदान करणार्या आप्तेष्टांच्या माध्यमातून ज्ञानदानाचे उपकार होत आहेत. शरीररचना शास्त्र हा वैद्यकीय अभ्यासक्रमाचा पाया आहे. हा पाया रचणार्या तुम्हा सर्वांच्या ऋणात आम्ही राहू इच्छितो असे त्यांनी सांगितले. तसेच डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयात नेत्रदानासाठी प्रस्ताव दाखल करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. देहदानाचे समाजदूत म्हणून तुमचे कार्य प्रेरणादायी असल्याचेही डॉ. उल्हास पाटील यांनी सांगितले. याप्रसंगी सुरेंद्र चौधरी, विनायक पाचपांडे, सुधाकर मोरे, चंद्रभागाताई यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुयश देशपांडे आणि पायल पाटील यांनी केले. तसेच यावेळी अॅनाटॉमी विभागातील देहदानाच्या प्रक्रियेत मोलाची भूमिका बजावणार्या स्टाफचाही सन्मान करण्यात आला.

**सत्काराचा मान हेच आमचे भाग्य - डॉ. प्रशांत सोळंके**

देहदान करणार्या व्यक्तींच्या कुटूंबातील सदस्यांचा सत्कार करण्याचा मान आम्हाला मिळाला हे आमचे भाग्यच असल्याचे मत अधीष्ठाता डॉ. प्रशांत सोळंके यांनी व्यक्त केले. तसेच देहदान हे प्रेरणादायी कार्य असून प्रत्येकाने देहदान करावे असे आवाहन त्यांनी केले.

**३८ जणांचा झाला सन्मान**

अॅनाटॉमी विभागातर्फे झालेल्या अत्यंत भावस्पर्शी कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते देहदान करणार्या व्यक्तींच्या कुटूंबातील ३८ सदस्यांना स्मृतीचिन्ह देऊन कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. यांनी घेतले परिश्रम यशस्वीतेसाठी वैष्णवी वानखेडे, पियुष कुकडे, शेख शहीद, रजस पाटील, रहीम कुरेशी, दिग्वीजय ठोंबरे, रोशन महाजन, गोपाल नांदुरकर, राजू धांडे यांनी परिश्रम घेतले.

## ट्रकला जबर धडक दिल्याने दोघांचा जागीच मृत्यू

**जळगाव : प्रतिनिधी**

जळगाव जिल्ह्यातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावर अपघातांचे सत्र थांबायला तयार नाही. पारोळा बायपासवर पंचर झालेल्या ट्रकची दुरुस्ती करत असताना मागून आलेल्या भरधाव ट्रकने धडक दिल्याने दोन व्यक्तींचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना ११ ऑक्टोबर रोजी दुपारी ३ वाजता घडली. मृत व्यक्तींपैकी एक जण गुजरात तर दुसरा चंद्रपूरचा रहिवासी आहे.

वीरेंद्र पतितपावन खोब्रागडे (वय-५२, रा. चंद्रपूर) आणि विभाभाई करसनभाई रबारी (वय-६२, रा. कच्छ-भुज, गुजरात) अशी अपघातात मयत झालेल्यांची नावे आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, १२ चाकी (जीजे १२ बीएक्स ९३३२) क्रमांकाच्या ट्रकचे चाक पंचर झाल्यामुळे क्लीनर वीरेंद्र खोब्रागडे आणि विभाभाई रबारी हे पारोळा बायपासवरील वळणावर ट्रक रस्त्याच्या कडेला लावून पंचर काढण्याचे काम करत होते.

यावेळी चंद्रपूर येथील रहिवासी असलेल्या आमिर खान अहमद खान (वय-३५) हा ट्रक क्रमांक (एमएच ३४ सीक्यू ०७१७) भरधाव वेगाने घेऊन आला आणि त्याने उभ्या असलेल्या ट्रकला मागून जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, पंचर काढणाऱ्या दोघांनाही गंभीर दुखापत झाली आणि त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. ट्रकचालक निलेश जैन यांच्या फिर्यादीनुसार, अपघातास कारणीभूत ठरलेल्या ट्रकचालक आमिर खान अहमद खान याच्या विरोधात पारोळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत प्रौढाचा जागीच मृत्यू

**जळगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील भादली ते भोकर दरम्यान अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिल्याने पायी जाणाऱ्या प्रौढाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना रविवारी १२ ऑक्टोबर रोजी रात्री १०.३० वाजता घडली आहे. याबाबत सोमवारी १३ ऑक्टोबर रोजी पहाटे ४ वाजता जळगाव तालुका पोलीस ठाण्यात अज्ञात वाहनावरील चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकाश नाना बारेला वय ४५ रा. भोकर ता. जळगाव असे मयत झालेल्या प्रौढाचे नाव आहे.

जळगाव तालुक्यातील भादली ते भोकर रस्त्यावरून प्रकाश बारेला हा रविवारी १२ ऑक्टोबर रोजी रात्री १०.३० वाजेच्या सुमारास भोकर येथे जाण्यासाठी पायी निघाला होता. त्यावेळी त्यांच्या मागून येणाऱ्या अज्ञात वाहनाने त्याला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात प्रकाश बारेला याचा जागीच मृत्यू झाला. अपघात घडल्यानंतर दुचाकी चालक हा वाहन घेवून पसार झाला होता. याप्रकरणी त्यांचा चुलत भाऊ अनिल बारेला याने जळगाव तालुका पोलीस ठाण्यात फिर्यद दिली आहे.

## "उमेद - अंतर्गत दिवाळी सणानिमित्त विविध स्टॉलचे आयोजन

**जळगाव : प्रतिनिधी**

उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत दिवाळी सणानिमित्त जी .एस . ग्राऊंड येथे बचत गटांच्या विविध स्टॉलचे आयोजन करण्यात आले आहेत .

भारतातील सर्वात मोठ्या सणामधील एक दिवाळी सण ह्या सणा निमित्त आपण आपले आप्तेष्ट मित्र परिवार ह्यांना विविध खाद्य पदार्थ , भेटवस्तू देत असतो . ह्या सणाच्या निमित्ताने ग्रामीण भागातील महिला बचत गटांनी तयार केलेले विविध पदार्थांची



मेजवाणी ग्राहकांसाठी दिनांक 14 ऑक्टोबर 2025 पासून जी . एस ग्राऊंड वर उपलब्ध होणार आहे. त्यात प्रामुख्याने दिवाळी सणानिमित्ताने अस्सल तेलात बनविलेले चविष्ट दिवाळी फराळ, चिवडा, लाडू, चकली, शंकरपाळे, फरसाण .इ खाद्य पदार्थ, गाईच्या शेणापासुन बनविलेले धूप, अगरबत्ती, पंचगव्य प्रोडक्ट, दिवाळी सजावटीसाठी हाताने बनविलेले मोती वर्क वस्तू, पणत्या, पूजा थाळी . आकाश कंदिल, तोरण, रांगोळी, फुल माळ, शोभेच्या वस्तू, उटणे, कागदी पिशव्या, मल्टी मिलेट्स खादय पदार्थ, केळी, बटाटा वेफर्स, आंघोळीचे साबण, रोस्टेड मिलेट्स, पुरण पोळी, लाकडी बैल गाड़ी, सर्व प्रकारचे मसाले, गावरान तुप, नानखटाई, खोबरे लाडू, इ खाद्य पदार्थ व दिवाळी साठीच्या विविध शोभिवंत वस्तू ह्या प्रदर्शन व विक्री साठी उपलब्ध राहणार आहेत.

## हनीट्रॅप प्रकरणात मनोज वाणी यांची निर्दोष मुक्तता

**जळगाव : प्रतिनिधी**

जिल्हा पेठ पोलीस ठाण्यात 2020 साली दाखल झालेल्या चर्चित हनीट्रॅप प्रकरणात आरोपी मनोज लीलाधर वाणी यांची जळगाव येथील पाचवे प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी मिलिंद एम. निकम यांच्या न्यायालयात निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.

या प्रकरणात फिर्यादी अभिषेक शांताराम पाटील यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, 16 ऑक्टोबर 2020 रोजी आरोपी शाकंभरी सुर्वे हिने त्यांना फोन करून "मला तुम्हाला भेटायचे आहे" असे सांगितले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी ती आणि तिचे साथीदार फिर्यादीच्या कार्यालयात भेटले. त्यावेळी त्यांनी फिर्यादीला सांगितले की, "तुमचे अश्लील फोटो आणि व्हिडिओ काढण्याचे काम मला दिले गेले आहे, पण



मला तुमचे नुकसान करायचे नाही. काही विरोधक तुम्हाला राजकारण आणि सामाजिक स्तरावरून दूर करण्याचा प्रयत्न करत आहेत," असे सांगण्यात आले होते. या घटनेनंतर फिर्यादीने संबंधित आरोपींविरुद्ध तक्रार दाखल केली होती. या खटल्याची सुनावणी गेल्या काही वर्षांपासून सुरू होती. अखेर 8 ऑक्टोबर 2025 रोजी न्यायालयाने या खटल्याचा निकाल देताना सबळ पुराव्याअभावी आरोपी मनोज लीलाधर वाणी यांची निर्दोष मुक्तता केली. या खटल्यात सरकार पक्षातर्फे अॅड. वडवी यांनी तर आरोपी मनोज वाणी यांचे वकील अॅड. कुणाल पवार यांनी बाजू मांडली. न्यायालयाच्या या निर्णयामुळे मनोज वाणी यांना मोठा दिलासा मिळाला असून, प्रकरणात न्याय मिळाल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

## पोलीस अंमलदार रवींद्र तायडे यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**जळगाव : प्रतिनिधी**

गोदावरी कॉलेज ऑफ नर्सिंगतर्फे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विद्यार्थी कल्याण विभागाच्या वतीने विशेष मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले. या सत्रात जळगाव शहर पोलीस स्टेशनचे पोलीस अंमलदार रवींद्र प्रल्हाद तायडे (दया ) यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना विविध महत्त्वपूर्ण विषयांवर मार्गदर्शन केले.या कार्यक्रमात त्यांनी सायबर



क्राईम व त्यावरील उपाययोजना, व्यसनमुक्तीचे महत्त्व, जीवनात खेळाचे स्थान, करिअर मार्गदर्शन आणि इतर अनेक विषयांवर माहितीपूर्ण व प्रबोधनात्मक भाषण केले. त्यांनी सांगितले की, आजच्या युवा पिढीला जर संभाव्य धोके व परिणाम आधीच सांगितले, तर त्यांच्या कडून भविष्यात होणारे अपराध थांबवता येऊ शकतात.या कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्या प्रा. विशाखा गणवीर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.विद्यार्थी कल्याण विभाग प्रमुख प्रा.मनोरमा,प्रा. स्वाती गाडेगोणे,प्रा.शिल्पा वाघमारे आणि प्रा पायल हांडे यांनी या कार्यक्रमाचे नियोजन व संयोजन केले.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीची जाणीव, स्वयंशिस्तीचे महत्त्व आणि सुरक्षित डिजिटल जीवनाबद्दलची जागरूकता निर्माण झाली. कार्यक्रमास विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# लोकसहभागातून देवगाव येथे वनराई बंधाऱ्याची निर्मिती

## मुख्यमंत्री पंचायत सक्षमीकरण अभियानांतर्गत जलसंधारणाचा आदर्श उपक्रम

**जळगाव : प्रतिनिधी**



मुख्यमंत्री पंचायत सक्षमीकरण अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांपैकी जलसंधारण हा एक महत्त्वपूर्ण घटक असून, त्यांअंतर्गत वनराई बंधारे बांधण्याच्या उपक्रमाला जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. याच अनुषंगाने पारोळा तालुक्यातील देवगाव येथे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांच्या उपस्थितीत वनराई बंधाऱ्याची निर्मिती करण्यात आली.

मंगळवार, दि. १४ ऑक्टोबर रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांनी देवगाव ग्रामपंचायत व प्राथमिक शाळेची पाहणी केली. या भेटीदरम्यान ग्रामपंचायत हद्दीतील निवडलेल्या साईटवर लोकसहभागातून वनराई बंधारा उभारण्यात आला.

या प्रसंगी सरपंच, ग्रामस्थ, गटविकास अधिकारी तसेच ग्रामपंचायतीचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. जलसंधारणाच्या दृष्टीने हा उपक्रम गावकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार असून, भविष्यातील पाणीटंचाई समस्येवर उपाय म्हणून तो प्रभावी ठरेल, असे यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले.

मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांनी उपस्थित ग्रामस्थांशी संवाद साधत "जलसंधारणाचे काम ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक ग्रामस्थाची सामाजिक जबाबदारी आहे. लोकसहभागातून उभारलेले बंधारे अधिक टिकाऊ आणि परिणामकारक ठरतात," असे प्रतिपादन केले.